| ४ | शिक्षक / शिक्षकेतर वाढीव पदांचा प्रस्ताव. |
|---|---|
| | अनुदानित अशासकीय माध्यमिक शाळांमध्ये पायाभूत पदाव्यतिरिक्त विद्यार्थी संख्येमुळे कार्यभारात झालेली वाढ विचारात घेता व अन्य कारणांमुळे वाढलेल्या पदाबाबत या विभागाकडून शिक्षण संचालनालयास वाढीव पदांबाबतची माहिती / प्रस्ताव या कार्यालयाच्या शिफारशीसह सादर करण्यात येतो.<br>सदरची माहिती / प्रस्ताव संचालनालयाकडून ज्या तक्त्यात किंवा नमुन्यात मागविण्यात येतो त्या नमुन्यात तो शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे / सोलापूर / अहमदनगर यांचेकडून त्यांच्या स्पष्ट शिफारशीसह या कार्यालयात मागविण्यात येतो. त्यानंतर प्राप्त माहितीचे / प्रस्तावाचे संकलन करुन या कार्यालयाच्या शिफारशीसह माहिती / प्रस्ताव शिक्षण संचालनालयास सादर करण्यात येतो. |